**<u>निशाणी क्र. २४ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे विरुध्द दिनांक २८/६/२०१७ इ. रोजी झालेला विना कैफियत व विना म्हणणेचा आदेश रद्द होवून कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यायालयीन कामाची पुरेशी माहिती नाही. प्रतिवादी क्र. १ हे कणकवली तालुक्यातील रहिवाशी असून त्यांचा स्वतःचा व्यवसाय आहे. त्यामुळे त्यांना वेळोवेळी कामानिमित्त बाहेर जावे लागते. त्यामुळे ते नेमल्या तारखांना उपस्थित राहू शकले नाहीत. प्रतिवादी क्र. २ हे वयोवृध्द इसम आहेत. त्यांचे मेंदूस नियमित रक्तपुरवठा होत नसल्याने त्यांना चक्कर येण्याचा त्रास आहे. त्यामुळे त्यांना हिंडणे फिरणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत सादर करता आली नाही. सदर कामी कैफियत देणेस त्यांनी मुद्दाम विलंब केलेला नाही. त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे न्यायदृष्टया गरजेचे आहे. तसे न झाल्यास त्यांचे न्यायहक्कास बाधा येवून त्यांचे कधीही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायपूर्ततेच्या दृष्टीने त्यांचेविरुध्द झालेला विनाकैफियत व विना म्हणणेचा आदेश रद्द होवून कैफियत व म्हणणे स्विकारण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

**२.** वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज खोटा व बेकायदेशीर आहे. अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण नमूद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती वादी यांनी केली आहे.

**३.** वादी व प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** प्रतिवादी यांनी अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे.

यावरुन त्यांच्या अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने प्रस्तुतचा दावा अधिकार घोषणेकरीता व निरंतर व्यादेशाकरीता दाखल केला आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेले वादाचे निराकरण याच दाव्याचेकामी होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १ व २ यांना दाव्यास कैफियत व म्हणणे सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादीस खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

— **<u>आदेश</u>** —

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ४००/— दयावी. त्यांनी त्यापैकी रक्कम रुपये २००/— वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड ( गि. सु. माने )
दिनांक : २६/०७/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.